सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४७५, ४६५, ४९२, ४४२, ४४३, ४४७
ई-मेल - desk2@dtemaharashtra.gov.in वेबसाईट : http://www.dte.maharashtra.gov.in

क्र. २/एनजीसी/विद्यार्थी संस्था बदल/२०२६/५०५ दिनांक : 8 JUL 2026

प्रति,

१) सहसंचालक,
तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय,
मुंबई, नाशिक, पुणे, छत्रपती संभाजीनगर, अमरावती व नागपूर

२) प्राचार्य, सर्व अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र/ फार्म डी, वास्तुशास्त्र, एचएमसीटी,
बीसीए, बीबीए, बीएमएस, बीबीएम व अभिकल्प इ. पदवी महाविद्यालये,
महाराष्ट्र राज्य

विषय : शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये सर्व शासकीय, शासन अनुदानित व विनाअनुदानित अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र / फार्म डी, वास्तुशास्त्र, एचएमसीटी, बीसीए, बीबीए, बीएमएस, बीबीएम व अभिकल्प इ. पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे पहिल्या वर्षानंतर पाठयक्रम बदल तसेच पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या वर्षानंतर संस्था बदल करण्याबाबत......

पहा : १) शासन अधिसूचना क्र.पपनि-२०२४/प्र.क्र.७२/तांशि-४, दि.२४ मार्च, २०२५
२) शासन अधिसूचिना क्रमांक नियम २०२५/प्र.क्र. ६५/तांशि ४, दि.१९ जुन, २०२५
३) शासन अधिसूचना क्र.नियम-२०२६/प्र.क्र.१६६/तांशि-४, दि.०२ जुलै, २०२६
४) या संचालनालयाचे परिपत्रक क्र. २/एनजीसी/वि.सं.ब./२०२६/५०४, दि.०८ जुलै, २०२६

शै. व. २०२६-२७ मध्ये सर्व शासकीय, शासन अनुदानित व विनाअनुदानित अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र / फार्म डी, वास्तुशास्त्र, एचएमसीटी, बीसीए, बीबीए, बीएमएस, बीबीएम व अभिकल्प इ. पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थेतील ईच्छुक व पात्र विद्यार्थ्यांना पहिल्या वर्षानंतर पाठयक्रम बदल, तसेच पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या वर्षानंतर संस्था बदल करण्यासाठीचे अर्ज ज्या शैक्षणिक संस्थेत पाठ्यक्रम बदल /संस्था बदल पाहिजे आहे, अशा संस्थेत दि.१५.०७.२०२६ पर्यंत करण्यासाठी संदर्भ क्रमांक ४ च्या परिपत्रकान्वये सुचित करण्यात आलेले आहे. यास्तव विद्यार्थी पाठ्यक्रम / संस्था बदलासाठी प्राप्त होणा-या अर्जांवर दि.२४.०३.२०२५ च्या शासन अधिसूचनेतील नियम क्रमांक १६ मधील तरतूदीनुसार सोबतच्या प्रपत्रात नमूद केल्यानुसार तीन स्तरावर मान्यता देण्याची कार्यवाही कालमर्यादेत करण्यात यावी. सदर कार्यवाही करतांना सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये व संबंधित संस्थांचे प्राचार्य यांनी नियमांचे काटेकार पालन करावे.

१. या संचालनालयाच्या संदर्भ क्रमांक ४ च्या परिपत्रकानुसार प्राप्त होणा-या अर्ज व त्यासोबतच्या कागदपत्रांची तपासणी प्राचार्य / सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये यांचे स्तरावरुन नियमातील तरतूदीनुसार करुन सोबतच्या प्रपत्रात नमुद केल्यानुसार कालमर्यादेत कार्यवाही करण्यात यावी.

२. विद्यमान संस्थेच्या संस्था प्रमुखांनी (Present / Parent Institute) विद्यार्थ्यांना संस्था बदलास ना-हरकत प्रमाणपत्र देतांना त्यामध्ये **Institute DTE Code, Students Application ID, Course Choice Code, Vacancy of concern branch, GAP Cert.** इ. माहिती नमूद करणे अनिवार्य राहील.

३. पाठ्यक्रम, संस्था व विद्यापीठ स्थलांतरणास संबंधित संस्थेने दिलेल्या ना-हरकत प्रमाणपत्र व रिक्त जागा विचारात घेऊन मान्यतेची कार्यवाही होणार आहे. याबाबत भविष्यात रिक्त जागा नसल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित

विद्यार्थ्याचे स्थलांतरण पुर्वलक्षी प्रभावाने रद्द करण्यात येईल, परिणाम स्वरुप विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसानीस संबंधित संस्थेच्या प्राचार्यांवर व्यक्तीश: जबाबदारी निश्चित करण्यात येईल.

४. संस्था बदल व शाखा बदलासह संस्था बदल याकरीता विद्यार्थ्यांनी ज्या विनाअनुदानित संस्थेसाठी विनंती केलेली आहे त्या विनाअनुदानित संस्थेच्या प्राचार्यांनी याबाबतच्या प्रस्तावावर कार्यवाही सोबतच्या प्रपत्रात नमूद कालमर्यादेत होईल, याची खबरदारी घ्यावी व आवश्यक तो पाठपुरावा वरिष्ठ कार्यालयांकडे त्यांचे स्तरावरुन करावा. तसेच पाठ्यक्रम / संस्था बदलाचे आदेश पारित झाल्यास ते विद्यार्थ्यांना ई-मेल द्वारे संस्था स्तरावरुन पाठविण्यात यावेत.

५. दि. २४.०३.२०२५ च्या शासन अधिसूचना आणि दि.०२.०७.२०२६ च्या सुधारीत शासन अधिसूचनेतील नियम क्रमांक १६ मधील पाठ्यक्रम, संस्था बदलाच्या तरतुदी / नियम स्पष्ट असून याबाबतची कार्यवाही करतांना नियम तथा तरतुदींचे उल्लंघन झाल्यास संबंधित प्राधिका-यास जबाबदार धरण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

६. <u>विद्यार्थी संस्था बदलाच्या नियमामध्ये अपवादात्मक परिस्थितीत विशेष बाब म्हणून नियम शिथील करण्याचे प्राधिकार नमूद नाहीत, त्यामुळे नियमानुसार संस्था बदल अनुज्ञेय नसलेल्या विद्यार्थ्यांची प्रकरणे संस्था व सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालये यांचे स्तरावरुन तात्काळ निकाली काढण्यात यावीत व तसे संबंधितांना कळविण्याची कार्यवाही करावी.</u>

७. <u>सर्व संस्था प्रमुखांना कळविण्यात येते की, बदली मागितलेल्या विद्यार्थ्यांस या संचालनालयाचे मान्यता आदेश प्राप्त झाल्यानंतरच लिव्हींग सर्टीफीकेट द्यावे व कोणत्याही परिस्थितीत तत्पुर्वी ते देण्यात येवू नये. तसेच संबंधित विद्यार्थ्याच्या संस्था बदलासाठी केवळ ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित केल्याच्या कारणास्तव त्यांचे संस्थेतील प्रवेश रद्द करु नये, अथवा सदर रिक्त होणा-या जागेवर संचालनालयाची मान्यता प्राप्त होण्यापुर्वी इतर विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येऊ नये.</u>

८. विद्यार्थी संस्था बदलास या संचालनालयाची / संचालनालयाने प्राधिकृत केल्यानुसार सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांची पूर्व मान्यता नसेल तर असा संस्था बदल अनधिकृत समजण्यात येईल. संचालनालयाच्या / विभागीय कार्यालयाच्या पूर्वमान्यतेशिवाय संस्था बदलाने जाण्यास संस्थेने (Present / Parent Institute) लिव्हींग सर्टीफीकेट देणे व संस्था बदलाने प्रवेश देणा-या संस्थेने (Aspiring Institute) त्या लिव्हिंग सर्टिफिकेट आधारे विद्यार्थ्यास प्रवेश दिल्यास त्यास संचालनालयामार्फत कार्योत्तर मान्यता देण्यात येणार नाही याची विशेष नोंद घ्यावी. या संचालनालयाची किंवा संचालनालयाने प्राधिकृत केलेल्या प्राधिका-याची पुर्व मान्यता नसतांना संस्था बदलीने प्रवेश दिल्याचे आढळून आल्यास विद्यार्थ्यांच्या होणा-या शैक्षणिक नुकसानीस संबंधित संस्था व संस्था बदलाने प्रवेश देणारी संस्था या दोन्ही संस्थांच्या संस्था प्रमुखांना जबाबदार धरून त्यांचे विरुध्द कारवाई करण्यात येईल.

९. विद्यार्थी संस्था बदलाबाबत सोबतच्या प्रपत्रात नमूद केल्यानुसार कालमर्यादेत कार्यवाही करण्यात यावी. सदर कालमर्यादेपुर्वी विद्यापीठाचा किंवा संस्थेचा <u>निकाल घोषित झाला नसेल तर, संबंधित विद्यार्थी शाखा बदल, संस्था बदल, संस्था बदलासह शाखा बदल, संस्था शाखा बदलास विद्यापीठ बदल इ. मागणीचा विचार करण्यात येणार नसल्याची माहिती नियमातील तरतुदीच्या आधारे संस्था स्तरावरुन विद्यार्थ्यांना देण्यात यावी.</u>

१०. विद्यार्थी संस्था बदलाबाबतचे विद्यार्थ्यांचा Annexure A मधील विनंती अर्ज व त्यासोबतची कागदपत्रे व सदर अर्जाची माहिती सोबतच्या Annexure B सह प्रस्ताव सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय व या संचालनालयास मुळ कागदपत्राची पडताळणी केल्याच्या प्रमाणपत्रासह पाठविण्यात यावेत. तसेच <u>"Annexure B"</u> ची Microsoft Excel sheet मधील Soft Copy संस्थेने सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालयास व तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालयांनी या संचालनालयास ई-मेल द्वारे सुध्दा पाठवावी.

११. अभ्यासक्रम / संस्था टप्प्याटप्प्याने बंद करतांना संस्थेत शिक्षण घेत असलेले सर्व विद्यार्थ्यांची टप्प्याटप्प्याने अभ्यासक्रम / संस्था बंद होण्याच्या कालावधीपर्यंत सर्व शैक्षणिक व इतर सोई सुविधा पुरविण्याची जबाबदारी संस्थेची असून तसे हमीपत्र संस्थेने अभ्यासक्रम बंद / संस्था बंद करतांना दिलेले आहे. त्याचप्रमाणे विद्यार्थी संस्था बदलाच्या नियमामध्ये अभ्यासक्रम / संस्था टप्प्याटप्प्याने बंद झाल्यामुळे संस्था बदलास अपात्र विद्यार्थ्यांना विशेष बाब म्हणून नियम शिथील करण्याची तरतूद असल्याने असे अर्ज आपले स्तरावरुन निकाली काढण्यात यावेत. तथापी, राज्यातील व्यावसायिक तंत्रज्ञान पदवी अभ्यासक्रमांच्या ज्या संस्था / संस्थेतील अभ्यासक्रमांचा टप्प्याटप्प्याने बंद करण्याचा कालावधी संपुष्ठात आल्यानंतर या संस्थेतील / अभ्यासक्रमाच्या उर्वरीत विद्यार्थ्यांचे

अन्य संस्थेत समावेशनाची कार्यवाही शासन निर्णय क्रमांक मान्यता-२०२०/(प्र.क्र.१३४/२०)/तांशि ५, दि.०१.०२.२०२१ नुसार कार्यवाही करावी.

१२. दि.२४.०३.२०२५ च्या शासन अधिसूचनेतील नियम क्रमांक १६ (४) अन्वये अधिसूचनेच्या अंतर्गत समाविष्ट नसलेल्या व्यावसायिक शैक्षणिक संस्थेतील विद्यार्थी विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शिक्षण संस्थेमध्ये संस्था व अभ्यासक्रम बदलासाठी, अधिसुचनेच्या कलम ३(१) मधील पात्रतेच्या अटी, शर्ती व निकष व नियम १६ (२) मधील नियमाच्या पुर्ततेच्या अधिन पात्र आहेत. सबब अशी प्रकरणे संबंधित विद्यार्थ्याची प्रथम, थेट द्वितीय वर्षात प्रवेशाच्या वेळी राज्यातील पात्रतेच्या अटी, शर्ती व निकषांच्या पृष्ठर्थ आवश्यक कागदपत्रांसह सादर करण्यात यावीत.

१३. सर्व अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र / फार्म डी, वास्तुशास्त्र, एचएमसीटी, बीसीए, बीबीए, बीएमएस, बीबीएम व अभिकल्प पदवी संस्थेतील प्राचार्यांनी संस्था बदलाबाबतची सुचना संस्थेच्या संकेतस्थळी व नोटीस बोर्डवर लावण्यात यावी. तसेच शक्य असल्यास विद्यार्थ्यांना अर्ज करण्यास ई-सुविधा उपलब्ध करुन द्यावी.

१४. सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचे स्तरावरुन संस्था बदलास दिलेली मान्यता व संस्था स्तरावरुन संस्थेअंतर्गत शाखा बदलास दिलेली मान्यता याची माहिती मा. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, ८ वा मजला, न्यू एक्सेलसिएर बिल्डींग, ए के नायक मार्ग,फोर्ट, मुंबई ४०० ००१ यांना व या संचालनालयास सादर करावी.

(डॉ.प्रमोद नाईक)
प्र.संचालक, तंत्र शिक्षण, म. रा. मुंबई

प्रत, माहितीसाठी सादर

१) मा. सचिव, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, ८ वा मजला, न्यू एक्सेलसिएर बिल्डींग, ए के नायक मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१ यांना माहितीसाठी सादर
२) मा. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य (पात्रता शाखा)
३) कार्यासन क्रमांक ३, मुख्य कार्यालय, मुंबई
४) कार्यासन क्रमांक २, निवड नस्तीस.

# <u>प्रपत्र - अ</u>

| अ. क्र. | तपशील | कार्यवाही | कालमर्यादा | कार्यवाही प्राधिकारी |
|---|---|---|---|---|
| १ | अ) संस्था अंतर्गत शाखा बदल | संबंधित संस्थेच्या प्राचार्यानी प्रथम वर्षाच्या किंवा प्रथम व व्दितीय सत्रांच्या एकत्रित गुणांच्या आधारे गुणवत्तनेसार शाखा बदलाची कार्यवाही करावी | दि.१६/७/२०२६ पर्यंत किंवा थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र व एचएमसीटी अभ्यासक्रमाच्या रिक्त जागा निश्चित (Confirm) करण्याचा दिनांकाच्या **५ दिवस अगोदर** यापैकी जे आधी घडेल त्या दिनांकापर्यंत | प्राचार्य, संबंधित संस्था यांचे स्तरावरून सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय यांचे मान्यतेने |
| | ब) संस्था बदल / संस्था बदलासह शाखा बदल | प्राप्त विनंती अर्जानुसार विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेच्या आधारे विहित नमुन्यातील अर्जावर आवश्यक ती माहिती भरून आवश्यक दस्तावेजासह त्यांचेकडील रिक्त जागांची माहिती व ना-हरकत प्रमाणपत्रासह प्रस्ताव अभ्यासक्रम निहाय सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांना सोबतच्या Annexure B च्या विहित नमुन्यातील माहितीसह Email द्वारे पाठविण्यात यावेत. | दि.१५/७/२०२६ पासून दि.१६/७/२०२६ किंवा थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र व एचएमसीटी अभ्यासक्रमाच्या रिक्त जागा निश्चित (Confirm) करण्याचा दिनांकाच्या <u>**४ दिवस अगोदर**</u> यापैकी जे आधी घडेल त्या दिनांकापर्यंत | संस्था बदलीने प्रवेश देणाऱ्या संस्थेचे प्राचार्य |
| २ | अ) संस्था बदल / संस्था बदलासह शाखा बदल (विभागांतर्गत विद्यापीठ बदलासह) | सर्व शासकीय, शासन अनुदानित व विनाअनुदानित संस्थाकडून संस्था बदलाबाबत विद्यापीठा अंतर्गत प्राप्त अर्जाच्या (१-ब नुसार) अनुषंगाने सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांनी त्यांचे कार्यक्षेत्रात असणा-या संस्था बदलाचे प्रकरणी मान्यतेची कार्यवाही करावी. | दि.१७/७/२०२६ पासून दि.२०/७/२०२६ किंवा थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र व एचएमसीटी अभ्यासक्रमाच्या रिक्त जागा निश्चित (Confirm) करण्याचा दिनांक यापैकी जे आधी घडेल त्या दिनांकापर्यंत | सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये |
| | ब) संस्था बदल / संस्था बदलासह शाखा बदल (आंतरविभागीय ) | सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचेकडे १-ब नुसार प्राप्त होणा-या विभागाच्या बाहेरील / आंतरविभागीय प्रस्तावांची दि.२४.०३.२०२५ च्या शासन अधिसूचना आणि दि.०२.०७.२०२६ च्या सुधारीत शासन अधिसूचनेतील नियम क्रमांक १६ मधील तरतूदीनुसार छाननी / तपासणी करून सोबतच्या Annexure B च्या विहित नमुन्यातील माहितीसह मान्यतेसाठी एकत्रित प्रस्ताव मान्यतेसाठी तंत्र शिक्षण संचालनालयास पाठविण्यात यावेत. | दि.१७/७/२०२६ पासून दि.२०/७/२०२६ किंवा थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र व एचएमसीटी अभ्यासक्रमाच्या रिक्त जागा निश्चित (Confirm) करण्याचा दिनांकाच्या **३ दिवस अगोदर** यापैकी जे आधी घडेल त्या दिनांकापर्यंत | सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये |

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी क्र.०२२-६८५९७३५६, ४६५, ४९२, ४४२

ई-मेल - desk२@dtemaharashtra.gov.in वेबसाईट : http://www.dte.maharashtra.gov.in

क्र. २/एनजीसी/वि.सं.ब./२०२६/५०४ दिनांक : 08 JUL 2026

परिपत्रक

विषय: शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र / फार्म डी, वास्तुशास्त्र, एचएमसीटी, बीसीए, बीबीए, बीएमएस, बीबीएम व अभिकल्प इ. पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे पहिल्या वर्षानंतर पाठयक्रम बदल, तसेच पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या वर्षानंतर संस्था बदल करण्याबाबत......

संदर्भ : १)शासन अधिसूचना क्र.पपनि-२०२४/प्र.क्र.७२/तांशि-४, दि.२४.०३.२०२५
२)शासन अधिसूचना क्र.नियम-२०२६/प्र.क्र.१६६/तांशि-४, दि.०२.०७.२०२६

या संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय, शासन अनुदानित व विनाअनुदानित अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र / फार्म डी, वास्तुशास्त्र, एचएमसीटी, बीसीए, बीबीए, बीएमएस, बीबीएम व अभिकल्प पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे पहिल्या वर्षानंतर पाठयक्रम बदल, तसेच पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या वर्षानंतर संस्था बदल करण्यास संदर्भीन अधिसूचनेतील नियम क्र. १६ अन्वये तरतूद करण्यात आलेली आहे. सदर नियमांची प्रत (मराठी व इंग्रजी मधील) सोबत माहितीसाठी जोडली असून त्यामध्ये पाठ्यक्रम बदल व संस्था बदलासाठीची प्रमुख पात्रता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | वर्ष | विनंती | पात्रता |
|---|---|---|---|
| १ | दुसरे वर्ष | अभियांत्रिकी पदवी पाठ्यक्रम / संस्था बदल | प्रथम व द्वितीय सत्र उत्तीर्ण किंवा उत्तीर्ण होण्यासाठी आवश्यक विषयापैकी एका विषयात अनुत्तीर्ण, पाठ्यक्रम / संस्था बदलीस विंनती केलेल्या शाखेत संबंधित संस्थेत रिक्त जागांची उपलब्धता, तसेच विद्यापीठ बदल होत असल्यास विद्यापीठाने निर्धारीत केलेली पात्रता. |
| २ | तिसरे वर्ष | संस्था बदल | प्रथम वर्ष उत्तीर्ण, द्वितीय वर्षाच्या परीक्षेमध्ये तृतीय व चतुर्थ सत्र उत्तीर्ण किंवा विद्यापीठाच्या सवलतीनुसार उत्तीर्ण होण्यासाठी आवश्यक विषयापैकी एका विषयात अनुत्तीर्ण, संस्था बदलीस विंनती केलेल्या संस्थेतील संबंधित वर्ग शाखेत रिक्त जागांची उपलब्धता व विद्यापीठ बदल होत असल्यास विद्यापीठाने निर्धारीत केलेली पात्रता |
| ३ | चौथे वर्ष | संस्था बदल | प्रथम व द्वितीय वर्ष उत्तीर्ण, तृतीय वर्षाच्या परीक्षेमध्ये पाचवे व सहावे सत्र उत्तीर्ण किंवा विद्यापीठाच्या सवलतीनुसार उत्तीर्ण होण्यासाठी आवश्यक विषयापैकी एका विषयात अनुत्तीर्ण, पाठ्यक्रम / संस्था बदलीस विंनती केलेल्या संस्थेतील संबंधित वर्ग शाखेत रिक्त जागांची उपलब्धता व विद्यापीठ बदल होत असल्यास विद्यापीठाने निर्धारीत केलेली पात्रता |

सदर संस्थामध्ये पाठ्यक्रम बदल व संस्था बदलासाठी अर्ज दि.१५.०७.२०२६ रोजी पर्यंत सादर करण्यात यावे.

(डॉ.प्रमोद नाईक)
प्र.संचालक, तंत्र शिक्षण, म. रा. मुंबई

प्रत : मा. सचिव, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, ८ वा मजला, न्यू एक्सेलसिएर बिल्डींग, ए के नायक मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१ यांना माहितीसाठी सादर

प्रत : माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित :-

१. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती व नागपूर

त्यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक त्यांचे कार्यक्षेत्रातील सर्व अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, एचएमसीटी, बीसीए, बीबीए, बीएमएस, बीबीएम व अभिकल्प पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थाना अग्रेषित करून संस्थेच्या संकेतस्थळी व सूचना फलकावर प्रसिध्द करण्यास कळविण्यात यावे.

२. प्राचार्य, सर्व अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र / फार्म डी, वास्तुशास्त्र, एचएमसीटी, बीसीए, बीबीए, बीएमएस, बीबीएम व अभिकल्प पदवी महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य.

त्यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक संस्थेच्या संकेतस्थळी व सूचना फलकावर प्रसिध्द करून पुढील उचित कार्यवाही कालमर्यादेत करण्यात यावी.

३. मा. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य (पात्रता शाखा)

४. कार्यासन क्रमांक ३, मुख्य कार्यालय, मुंबई

५. कार्यासन क्रमांक २, निवड नस्तीस.

**ANNEXURE – A**

**APPLICATION FOR CHANGE OF COURSE OR INSTITUTION AFTER I, II OR III YEAR**

1. Name of the Student (In Full ) : ______________________________________________

2. Application ID : ______________________________________________

3. Academic year of Admission in the present Institute : ______________________________________________

4. Whether Admission is under Supernumerary quota (Y/N) : ______________________________________________

5. Address for correspondence with Pin code & Telephone Nos. (if any) : ______________________________________________

6. Name of Parent Institute / Present Institute with DTE Code : DTE CODE ____________________________________
Name ____________________________________

7. Course of Study Details : Year / Semester _________ Branch _______________
Choice Code ____________________________________

8.. Details of the Result of last exam.

| Branch / Faculty | Year / Semester | Year of Passing | Summer / Winter | No. of attempt | Percentage | University |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | 2. | 3. | 4. | 5. | 6. | 7 |
| | | | | | | |

9. Details of backlog subjects (if any) : ______________________________________________

10. Name and DTE code of aspiring institute where admission by transfer is sought : DTE CODE _____________
Name ____________________________________

11. Branch & Year / Semester and university in which admission by transfer is sought : Branch / Course ____________________________________
Year / Semester ____________________________________
Choice Code____________________________________
University ____________________________________

12. Reasons for change of Institute/ change of branch and University : ______________________________________________
______________________________________________

I the undersigned state that the information stated above is true to my knowledge and belief. I am fully aware that transfer / change of institute / branch is not a right and it is up to the authority to decide my case on the basis of merit.

**Date : / /2026** **Signature of Student**

---

Name and DTE code of the Parent Institute / Present Institute: ______________________________________________

No --------------------- Date :- / /2026

**No Objection Certificate**

Certified that information furnished by applicant (Name) ------------------------------ is verified form the record. His / Her admission was not under supernumerary quota / TFWS category. This institute has no objection for his / her transfer from this college / institute.

Seal of College / Institute **Signature of Principal**

---

Name and DTE code of the Aspiring Institute: ______________________________________________

No --------------------- Date :- / /2026

**No Objection Certificate**

This institute has no objection & agrees to admit the above candidate Shri / Kum. ____________________________________ to the branch ____________________________________ to Year / Semester ____________________________________ during the current academic year __________ , After admitting all the internal students and ex-students and exhausting the claims of change of branch of internal candidates, the vacancies in year and course _________ are ___________ ( Nos.) I have ascertained the eligibility of the candidate for the above mentioned admission.

Seal of College / Institute **Signature of the Principal**

---

**Note: Institute's NOC can be issued on the letter head of the College / Institute separately if desired so by Director / Principal.**

RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ११, अंक ४१] सोमवार, मार्च २४, २०२५/चैत्र ३, शके १९४७ [पृष्ठे ६४, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ११५**

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### उच्च व तंत्रशिक्षण विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२, दिनांक २४ मार्च २०२५.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५.**

क्रमांक पपनि-२०२४/प्र.क्र. ७२/तांशि-४.—महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ (२०१५ चा महा.२८) याच्या कलम ५ च्या पोटकलम (५) त्यासह कलम २३ द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, आणि शासन अधिसूचना, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र. टीईएम-२०१६/सीआर ४७३(भाग-३)/तांशि-४, दि.२४ एप्रिल, २०१७ व शासन अधिसूचना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. टीईएम-२०१६/सीआर ४७३/ १६(भाग-४)/तांशि-४, दि.२४ एप्रिल, २०१७ याचे अधिक्रमण करून, महाराष्ट्र शासन, या द्वारे पूर्ण वेळ व्यावसायिक पदवी पूर्व आणि पदव्युत्तर पदवी, व्दि-पदवी, एकात्मिक, (अभियांत्रिकी व तंत्रज्ञान पाठ्यक्रम, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, हॉटेल व्यवस्थापन व खाद्यपेय तंत्रज्ञान, नियोजन, संकल्पन, व्यवस्थापन, संगणक उपयोजन) अभ्यासक्रमाच्या प्रथम व थेट व्दितीय वर्ष प्रवेशासाठी नियम अधिसूचित करीत आहे,—

१. **संक्षिप्त नाव व प्रारंभ.—**

(१) या नियमांना, महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (पूर्ण वेळ व्यावसायिक पदवीपूर्व, पदव्युत्तर पदवी, एकात्मिक किंवा व्दि-पदवी तांत्रिक पाठ्यक्रमांच्या प्रवेशाचे विनियमन) नियम, २०२४ असे म्हणावे.

(२) ते शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून अंमलात येईल.

२. **व्याख्या.—**

(१) या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) "अधिनियम" याचा अर्थ, महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ (सन २०१५ चा महा. २८), असा आहे;

प्रत संस्थेला सादर केली किंवा नाही याबाबत काहीही असले तरी संस्था, उमेदवाराने प्रवेश रद्द करण्यासाठी ऑनलाईन पद्धतीने सादर केलेली विनंती अंतिम मानेल. अशाप्रकारे जागा रद्द झाल्याने उमेदवार त्या जागेवरील हक्क गमावेल व ती जागा पुढील वाटपासाठी उपलब्ध होईल. तद्नंतर उमेदवार शुल्क परताव्याचा दावा करू शकेल व प्रणाली निर्मित अर्जाची स्वाक्षरित प्रत संस्थेला सादर केल्याच्या दोन दिवसाच्या आत संस्था प्रक्रिया शुल्क म्हणून रुपये एक हजार वजा करून शुल्क परतावा आणि उमेदवारास सर्व मूळ प्रमाणपत्रे परत करेल ;

(ख) सक्षम प्राधिकाऱ्याने निर्धारित केलेल्या प्रवेशाच्या अंतिम दिनांकास संध्याकाळी ५ वाजल्या नंतर प्रवेश रद्द करण्यासाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज केला असल्यास उमेदवार प्रतिभूती ठेव आणि तारण धनठेव व्यतिरिक्त शुल्क परताव्यास पात्र असणार नाही. प्रवेशासाठी ऑनलाइन रद्द करण्याची लिंक कट ऑफ दिनांका नंतर निष्क्रिय केली जाईल. कट ऑफ दिनांका नंतर उमेदवारास प्रवेश रद्द करण्यासाठी संस्थेकडे अर्ज सादर करावा लागेल. ;

(ग) कोणतीही संस्था, ज्यांच्याकडे उमेदवारांनी त्यांची प्रमाणपत्रे, पदवी, पदविका व इतर कागदपत्रे त्या संस्थेमध्ये प्रवेशासाठी जमा केलेली असतील, व जर उमेदवार अशा संस्थेमध्ये पाठ्यक्रम पुढे चालू ठेवण्यासाठी किंवा त्या संस्थेतील सुविधा घेण्यासाठी इच्छुक नसतील अशा प्रसंगी जमा करण्यात आलेली प्रमाणपत्रे, पदवी, पदविका व इतर कागदपत्रे उमेदवारास परत करण्यास कोणत्याही प्रकारे विरोध करणार नाहीत किंवा त्यासाठी अशा पाठ्यक्रमाचे किंवा इतर कोणतेही शुल्क अदा करण्यासाठी त्याच्यावर दबाव टाकणार नाहीत.

(घ) संस्थेला कोणत्याही वेळी प्रवेश रद्द करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्याकडून पुढील वर्षांचे शुल्क वसूल करण्याचा अधिकार असणार नाही.

**१६. पहिल्या, दुसऱ्या किंवा तिसऱ्या वर्षानंतर पदवी पूर्व पदवी आणि व्दि पदवी / एकात्मिक पाठ्यक्रमाच्या उमेदवारांचे पाठ्यक्रम किंवा संस्था बदलणे,—**

(१) प्रथम वर्षाचा अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण केल्यानंतर म्हणजेच प्रथम व द्वितीय सत्र उत्तीर्ण असलेले किंवा उत्तीर्ण होण्यासाठी आवश्यक विषयापैकी एका विषयात अनुत्तीर्ण असलेले, पाठ्यक्रम किंवा पाळी बदलण्याची विनंती करणाऱ्या उमेदवाराला, जागांच्या उपलब्धतेच्या अधीन राहून त्याच संस्थेत तसे बदल करण्याची मुभा देण्यात येईल आणि हे बदल प्रथम वर्षाच्या/प्रथम व व्दितीय सत्रांच्या एकत्रित गुणांच्या आधारे करण्यात येतील. उमेदवार जो पाठ्यक्रम बदलून घेणार आहे त्या पाठ्यक्रमासाठी संबंधित विद्यापीठाने निर्धारित केल्याप्रमाणे उमेदवारांच्या पात्रतेची सुनिश्चिती करण्याची जबाबदारी संबंधित संस्थेच्या प्राचार्यांची असेल.

(२) उमेदवारांचा एक / दोन / तीन वर्षानंतर (पाठ्यक्रम आणि/किंवा संस्था) बदल खालीलप्रमाणे करण्यात येतील,—

(क) प्रथम /द्वितीय वर्षात एकदा प्रवेश घेतलेला उमेदवार त्याच शैक्षणिक वर्षात इतर कोणतीही संस्था बदलून मागण्यास पात्र असणार नाही;

(ख) प्रथम वर्षाच्या परीक्षेमध्ये (प्रथम व व्दितीय या दोन्ही सत्रांच्या) / द्वितीय वर्षाच्या परीक्षेमध्ये (तृतीय व चतुर्थ सत्राच्या) / तृतीय वर्षाच्या (पाचव्या व सहाव्या सत्राच्या) सर्व विषयामध्ये उत्तीर्ण असणारा किंवा उत्तीर्ण होण्यासाठी आवश्यक असलेल्या विषयांपैकी एका विषयात अनुत्तीर्ण असलेला उमेदवार तसेच द्वितीय वर्षातील बदलासाठी प्रथम वर्षात उत्तीर्ण व तृतीय वर्षातील बदलासाठी प्रथम व द्वितीय वर्षात उत्तीर्ण उमेदवारास संस्था किंवा पाठ्यक्रम बदलून घेण्यास पात्र असल्याचे समजण्यात येईल;

(ग) विना-अनुदानित संस्थेतील विद्यार्थ्यांना कोणत्याही परिस्थितीत शासकीय, शासकीय अनुदानित, विद्यापीठ विभाग, किंवा विद्यापीठ संचालित संस्था, कोणत्याही टप्प्यावर बदलून घेता येणार नाही. तथापि शासकीय, शासकीय अनुदानित, विद्यापीठ विभाग, किंवा विद्यापीठ संचालित संस्थेतील उमेदवाराला विनाअनुदानित शैक्षणिक संस्थेमध्ये बदल करून देण्याची मागणी करता येईल;

(घ) विद्यार्थ्यांना, कोणत्याही टप्प्यावर स्वायत्त संस्थांमध्ये बदलून जाता येणार नाही;

(ङ) विनाअनुदानित संस्थांमध्ये बदलून जाणे :— विनाअनुदानित संस्थांचे प्राचार्य हे, तंत्र शिक्षण संचालनालयाच्या पूर्व मान्यतेने, संस्थेचे ना-हरकत प्रमाणपत्र, विद्यापीठाचे विद्यापीठ पात्रता प्रमाणपत्र व रिक्त जागांबाबतची स्थिती सादर केल्यावर, बदल करून घेण्याच्या मागणीसाठी इतर संस्थामधील उमेदवारांचा विचार करतील. उमेदवार जो पाठ्यक्रम बदलून

घेत आहे त्या पाठ्यक्रमासाठी संबंधित विद्यापीठाने निर्धारित केल्याप्रमाणे उमेदवारांच्या पात्रतेची सुनिश्चिती संस्थेचे प्राचार्य किंवा संचालक करतील;

(च) संस्थेच्या प्राचार्यांच्या शिफारशी शिवाय तंत्र शिक्षण संचालनालयाकडून कोणताही अर्ज दाखल करून घेतला जाणार नाही;

(छ) जर बदल करून घेण्याच्या प्रक्रियेपूर्वी विद्यापीठाचा किंवा संस्थेचा निकाल घोषित झाला नसेल तर, त्या विद्यापीठाचे किंवा संस्थेचे उमेदवार बदल करून घेण्याची मागणी करू शकणार नाही.

(३) अधिसंख्य कोट्यातील जागे अंतर्गत प्रवेश देण्यात आलेले उमेदवार हे पाठ्यक्रम किंवा संस्था बदलण्यासाठी पात्र असणार नाहीत.

(४) या अधिनियमाच्या अंतर्गत समाविष्ट नसलेल्या व्यावसायिक शैक्षणिक शिक्षण संस्थामधील उमेदवार, या अधिसूचने अंतर्गत समाविष्ट विना अनुदानित खाजगी व्यावसायिक शिक्षण संस्थेमध्ये संस्था व अभ्यासक्रम बदलासाठी, अधिनियमाच्या कलम ३ च्या पोट नियम (१) च्या तरतुदीं अन्वये पात्रतेच्या अटींची व वरील (२) मधील नियमांच्या पूर्ततेच्या अधीन राहून पात्र असतील.

(५) अशा सर्व बदलांची यादी तंत्र शिक्षण संचालक अंतिम मान्यतेसाठी प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या कार्यालयाला कळवील.

**अनुसूची -एक**

**(प्रथम वर्ष प्रवेशाकरिता)**

(नियम ६ व ७ पहा)

**क. पदवी पूर्व पदवी आणि व्दि पदवी व एकात्मिक पाठ्यक्रमांच्या मंजूर प्रवेश क्षमते अंतर्गत जागांचे वाटप**

| अ.क्र. | संस्थेचा प्रकार | जागांची संख्या - मंजूर प्रवेश क्षमतेच्या टक्केवारीप्रमाणे (३) | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया जागा (३ ए) | | | संस्थास्तरीय जागा (अनिवासी भारतीयांसाठी ५% कोट्यासह, लागू असेल तर) |
| | | महाराष्ट्र राज्यातील उमेदवार | अल्पसंख्याक समाजासाठी जागा | अखिल भारतीय स्तरावरील जागा | |
| (१) | (२) | (एक) | (दोन) | (तीन) | (३ ब) |
| १ | विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (अल्पसंख्याकासाठीच्या संस्था वगळून) | **स्वायत्त -** ६५ टक्के (राज्यस्तरीय)<br>**बिगर स्वायत्त -** मूळ विद्यापीठासाठी ४५.५ टक्के, मूळ विद्यापीठेतर अन्य विद्यापीठासाठी १९.५ टक्के | काही नाही | १५ टक्के | २० टक्के |
| २ | विना अनुदानित अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था | **स्वायत्त* -**<br>महाराष्ट्र राज्यातील जागांपैकी$ १०० टक्के (राज्यस्तरीय) | किमान ५१ टक्के @ | केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेअंतर्गत असणाऱ्या जागांपैकी १५ टक्के# | २० टक्के |

(*b*) Candidate shall not be entitled to any refund of his/her fee except the Security Deposit and Caution Money Deposit if the online cancellation is effected by the candidate after 5.00 p.m. of the cut-off date prescribed by the Competent Authority. Link for online cancellation for admission shall be deactivated after cut off date. Candidate has to apply for cancellation of admission to the institute by submitting application to the Institute after the cut off date;

(*c*) No institution, who has in its possession or custody, of any document in the form of Certificates, Degree, Diploma or any other award or other document deposited with it by a person for the purpose of seeking admission in such institution, shall refuse to return such Certificate, Degree, Diploma, award or any other document with a view to induce or compel such person to pay any fee or fees in respect of any course or program of study which such person does not intend to pursue or avail any facility in such institution;

(*d*) The Institution shall not entitle to recover the fees for the subsequent years from the student seeking cancellation of his admission at any point of time.

16. *Change of Course or Institution after First, Second or Third year of Undergraduate and Dual Degree or integrated programme*.—

(1) The candidate seeking for a change in course or shift after successfully completing the First Year of studies or both first and second semester examination in all subjects or failed in one of the heads of passing, shall be allowed to do so in the same institution subject to the availability of seats and changes shall be carried out based on the marks of First Year or First and Second Semester together. The Principal shall be responsible for ascertaining the eligibility of the candidate as laid down by the concerned University for the course to which the candidate is being transferred.;

(2) Transfer of candidates (Course and/or Institution) after first or second or third year shall be made in the following manner.—

(*a*) The candidate once admitted in first or second year shall not be eligible for transfer to any other Institution during the same academic year;

(*b*) The candidate passing the first year (both first and second semester) or second year (both third and fourth semester) or third year (both fifth and sixth semester) examinations in all subjects or failed in one of the heads of passing are considered as eligible for transfer of Institution or course:

Provided that for transfer after second year the candidate should have passed the first year, and for transfer after third year the candidate should have passed first and second year;

(*c*) There shall be no transfer of students at any stage in any case from Unaided Institutions to the Government or Government Aided, University Departments, University Managed Institutions. However, the candidate from the Government or Government Aided, University Departments, University Managed Institution may seek transfer to the Unaided Educational Institution;

(*d*) There shall be no transfer of students at any stage to Autonomous Institutions;

(*e*) Transfer to Unaided Institutions.—The Principals of Unaided institutions shall consider the candidate from other institutions for transfer with prior approval from the Director of Technical Educationon on submission of No Objection Certificate (NOC) from Institution, Eligibility Certificate from University and Vacancy position. The Principal or Director shall ascertain the eligibility of candidates as laid down by the concerned University for the course to which the candidate is being transferred;

(*f*) No application without recommendation of the Principal of Institution shall be entertained by the Director of Technical Education;

(*g*) If the result of the University or Institution is not declared before the process of transfer, candidate of that University or Institution shall lose his claim on transfer;

(3) The candidates admitted under Supernumerary Quota seats are not eligible for change of Course or Institution;

(4) The candidates from the professional educational institutions which are outside the purview of the Act shall be eligible for transfer to the unaided private professional Educational Institutions subject to the fulfilment of eligibility criterion and requirements stipulated under the provisions of sub-section (*1*) of section 3 of the Act and the fulfilment of the conditions stated in sub-rule (2).

(5) List of all such transfers shall be communicated by the Director of Technical Education to the office of the Admissions Regulating Authority for final approval.

RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष १२, अंक १०२(२)] गुरुवार, जुलै २, २०२६/आषाढ ११, शके १९४८ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ३८७**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### उच्च व तंत्र शिक्षण विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२, दिनांक २ जुलै २०२६

### अधिसूचना

**महाराष्ट्र व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेशाचे विनियमन) आणि विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (शुल्काचे विनियमन) अधिनियम, २०१५.**

क्रमांक नियम-२०२६/प्र.क्र.१६६/तांशि-४.— महाराष्ट्र व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेशाचे विनियमन) आणि विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (शुल्काचे विनियमन) अधिनियम, २०१५ (२०१५ चा महा. २८) च्या कलम २३ त्यासह वाचा कलम ३ चे पोट-कलम(३) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (पूर्ण वेळ व्यावसायिक पदवीपूर्व, पदव्युत्तर पदवी, एकात्मिक किंवा द्वि-पदवी तांत्रिक पाठ्यक्रमांच्या प्रवेशाचे विनियमन) नियम, २०२४ यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहे :—

१. या नियमांस, महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (पूर्ण वेळ व्यावसायिक पदवीपूर्व, पदव्युत्तर पदवी, एकात्मिक किंवा द्वि-पदवी तांत्रिक पाठ्यक्रमांच्या प्रवेशाचे विनियमन) (सुधारणा) नियम, २०२६ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (पूर्ण वेळ व्यावसायिक पदवीपूर्व, पदव्युत्तर पदवी, एकात्मिक किंवा द्वि-पदवी तांत्रिक पाठ्यक्रमांच्या प्रवेशाचे विनियमन) नियम, २०२४ मधील मुख्य नियम १ मधील,—

(एक) पोट-नियम(१) संक्षिप्त नाव व प्रारंभ, मधील "विनाअनुदानित खाजगी" हे शब्द हे वगळण्यात येतील:—

(दोन) पोट-नियम(२) नंतर पुढील पोट-नियम जादा दाखल करण्यात येईल,—

"(३) तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिकारक्षेत्रांतर्गत येणाऱ्या शासकीय, शासकीय अनुदानित आणि विद्यापीठीय विभागांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी देखील, वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयांमध्ये नमूद केलेल्या जागांच्या वाटपानुसार, हे नियम लागू असतील."

३. मुख्य नियमांच्या नियम ५ मधील, पोट-नियम(५) नंतर खालील परंतुक जादा दाखल करण्यात येईल ;

"परंतु, दिनांक ४ मार्च २०२१ पूर्वी ज्या उमेदवारांनी ओसीआय दर्जा प्राप्त केला असेल ते ओसीआय उमेदवार खालील प्रवर्गांमध्ये प्रवेशासाठी पात्र असतील,—

(१) महाराष्ट्र राज्य उमेदवारी प्रवर्ग : जर महाराष्ट्र राज्यातून १०वी आणि १०+२ परीक्षा उत्तीर्ण केली असेल आणि महाराष्ट्रात दहा किंवा अधिक वर्षे वास्तव्य करत असेल ;

(२) अखिल भारतीय उमेदवारी प्रवर्ग : जर महाराष्ट्र राज्याबाहेरील संस्थेतून १०वी आणि १०+२ परीक्षा उत्तीर्ण केली असेल आणि भारतात दहा किंवा अधिक वर्षे वास्तव्य करत असेल."

(रिट याचिका (सी) क्रमांक ८९१/२०२१ मधील माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार) ;"

४. मुख्य नियमांच्या नियम ८ मध्ये, पोट-नियम(३) च्या खंड(ग) मधील उप-खंड(एक) मध्ये, पहिल्या परंतुकानंतर खालील परंतुक जोडले जाईल,—

"तसेच, कॉम्प्युटर ॲप्लिकेशन्स (BCA) आणि व्यवस्थापन (BBA/BMS/BBM इत्यादी) अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी,—

(एक) MAH - BBA/BMS/BBM/BCA-CET परीक्षेला बसलेल्या उमेदवारांची यादी संपल्यानंतर जागा रिक्त राहिल्यास, MHT-CET-(PCM गट) आणि MHT-CET-(PCB गट) या परीक्षांपैकी ज्या परीक्षेत उमेदवाराने उच्च पर्सेंटाइल गुण मिळवले असतील, अशा उमेदवारांचा विचार केला जाईल.

(दोन) MHT-CET-(PCM गट) आणि MHT-CET-(PCB गट) परीक्षांना बसलेल्या उमेदवारांमध्ये गुण साम्यता आढळल्यास, MHT-CET-(PCM गट) परीक्षेला बसलेल्या उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल.".

५. मुख्य नियमांच्या नियम १० मधील, पोट-नियम(१) मधील खंड(ख) रद्द करण्यात येईल.

६. मुख्य नियमांच्या नियम १२ मध्ये,—

(१) खंड(त्र) ऐवजी खालील खंड दाखल करण्यात येईल,

"(त्र) जागा स्वीकृती शुल्क हे शासनाच्या पूर्वमान्यतेने सक्षम प्राधिकरणाने ठरवल्याप्रमाणे असेल आणि ते शुल्क ना-परतावा प्रक्रिया शुल्क' (non-refundable processing fee) म्हणून मानले जाईल.".

(दोन) खंड(थ) नंतर, खालील खंड समाविष्ट करण्यात येईलः—

"(द) पदवी अभ्यासक्रमांच्या थेट तृतीय वर्षात (लॅटरल एन्ट्री) आणि चौथ्या वर्षात (लॅटरल एन्ट्री) नुसार १३ प्रवेश देण्याची प्रक्रिया संबंधित संस्थांमार्फत या नियमांमधील नियम १३ नुसार राबविली जाईल,—

(एक) प्रवेशासाठीची पात्रता ही संबंधित विद्यापीठाच्या पात्रता निकषांच्या अधीन राहून विहित केल्याप्रमाणे असेल ;

(दोन) या प्रवेशांसाठी 'लॅटरल एन्ट्री' आणि 'अधिसंख्य' (अतिरिक्त) जागांची संख्या समुचित प्राधिकरणाद्वारे वेळोवेळी निश्चित केल्याप्रमाणे असेल ;

(तीन) परदेशी सहयोगाने (फॉरेन कोलॅबोरेशन) आणि ट्विनिंग प्रोग्राम अंतर्गत 'लॅटरल एन्ट्री' आणि 'अधिसंख्य' जागांना परवानगी दिली जाणार नाही ;

(चार) सक्षम प्राधिकरण प्रवेशासाठी उपलब्ध असलेल्या जागांचा तपशील आणि उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करेल.".

७. मुख्य नियमांच्या नियम १६ मध्ये,—

(१) पोट-नियम(२) मधील खंड(क) ऐवजी पुढील खंड दाखल करण्यात येईलः—

"(क) एखाद्या अभ्यासक्रमाच्या प्रथम, द्वितीय, तृतीय किंवा चतुर्थ वर्षात एकदा प्रवेश घेतलेला उमेदवार त्याच शैक्षणिक वर्षात इतर कोणत्याही अभ्यासक्रमास किंवा संस्थेत बदलीसाठी पात्र असणार नाही.".

(२) पोट-नियम(२) मधील खंड(घ) रद्द करण्यात येईल.

महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**संतोष पु. खोरगडे,**
सहसचिव, महाराष्ट्र शासन.

## HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 2nd July 2026.

*NOTIFICATION*

THE MAHARASHTRA PROFESSIONAL EDUCATIONAL INSTITUTIONS (REGULATION OF ADMISSIONS) AND UNAIDED PRIVATE PROFESSIONAL EDUCATIONAL INSTITUTIONS (REGULATION OF FEES) ACT, 2015.

No. Niyam-2026/C.R.166/TE-4.— In exercise of the powers conferred by Section 23 read with sub-section (*3*) of Section 3 of the Maharashtra Professional Educational Institutions (Regulation of Admissions) and Unaided Private Professional Educational Institutions (Regulation of Fees) Act, 2015 (Mah. XXVIII of 2015), the Government of Maharashtra hereby makes the following rules to amend the Maharashtra Unaided Private Professional Educational Institutions (Regulation of Admission to the Full Time Professional Undergraduate, Post Graduate, Integrated or Dual Degree Technical Courses) Rules, 2024, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Unaided Private Professional Educational Institutions (Regulation of Admission to the Full Time Professional Undergraduate, Post Graduate, Integrated or Dual Degree Technical Courses) (Amendment) Rules, 2026.

2. In rule 1 of the Maharashtra Unaided Private Professional Educational Institutions (Regulation of Admission to the Full Time Professional, Undergraduate, Postgraduate, Integrated or Dual Degree Technical Courses) Rules, 2024,—

(*i*) in sub-rule (1), in Short title and Commencement, the words "Unaided Private" shall be deleted ;

(*ii*) after sub-rule (2) following sub-rule shall be added, namely,—

"(*3*) These rules shall also be applicable for admissions to Professional Courses in Government, Government Aided and University Departments under the jurisdiction of Directorate of Technical Education, as per the Seat Distributions mentioned in the GR's issued from time to time for that purpose.".

3. In rule 5 of the principal Rules, after sub-rule (5) following proviso shall be added, namely,—

"Provided that, OCI candidates are eligible for admission in following categories, if they obtained OCI status before 04th March 2021,—

(*1*) Maharashtra Candidature Category: if passed 10th and 10+2 examination from State of Maharashtra and living in Maharashtra for ten or more years ;

(*2*) All India Candidature Category: if passed 10th and 10+2 examination from the institute outside state of Maharashtra and living in India for ten or more years.".

(As per the directives of Hon'ble Supreme Court Order in W.P. (C) No. 891 of 2021) ;"

4. In rule 8 of the principal Rules, in sub-clause (*i*) of clause (*c*) of sub-rule (3) following proviso shall be added after the first proviso, namely,—

"Provided further that, for admissions to Computer Applications (BCA), Management (BBA/ BMS/BBM etc.) courses,—

(*i*) if seats remain vacant after exhausting the list of the candidates appeared for MAH - BBA/BMS/BBM/BCA-CET examination then, candidates obtaining higher percentile of marks in any examination out of MHT-CET-(PCM Group) and MHT-CET-(PCB Group) shall be considered.

(*ii*) In case of tie, between the candidates appeared for MHT-CET-(PCM Group) and MHT-CET-(PCB Group) examination then preference shall be given to candidates appeared for MHT-CET-(PCM Group).".

5. In rule 10 of the principal Rules, clause (*b*) of sub-rule (1) shall be deleted.

6. In rule 12 of the principal Rules,—

(*1*) for clause (*j*), the following clause shall be substituted, namely :—

"(*j*) The seat acceptance fee shall be as decided by the Competent Authority with the prior approval of the Government and the same shall be treated as non-refundable processing fee.".

(*2*) after clause (*q*), following clause shall be inserted, namely :—

"(*r*) Admission to Direct Third Year (Lateral Entry) and Fourth year (Lateral Entry) of Under Graduate Courses shall be carried out by the respective institutes as per rule 13 of these rules,—

(*i*) Eligibility for admission shall be as specified subject to eligibility criteria of the respective University ;

(*ii*) Lateral Entry and Supernumerary seats for these admissions, shall be as prescribed time to time by the Appropriate Authority ;

(*iii*) Lateral Entry and supernumerary seats shall not be allowed in Foreign Collaboration and Twinning Programme;

(*iv*) Competent Authority shall prepare vacancy available for admissions and merit list of the Candidates.".

7. In rule 16 of the principal Rules,—

(*1*) in sub rule (2), for clause (*a*), the following clause shall be substituted, namely :—

"(a) The candidate once admitted to the first, second, third or fourth year for a course shall not be eligible for transfer to any other course or Institution during the same academic year.".

(*2*) in sub-rule (2), clause (*d*), shall be deleted.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SANTOSH P. KHORGADE,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.

The Department shall forward such cases along with observations to the Minorities Development Department as per the provisions of sub-section (2) of section 6 of the Act.

**15. Cancellation of Admission and Refund of fees, return of documents by Institutions**

*(a)* The Candidate shall apply online for cancellation and submit duly signed copy of system generated application for cancellation of admission to the Institution. Once the candidate submits online request for cancellation, his admission shall be treated as cancelled. The Institute shall consider the online request made by candidate for cancellation as final, irrespective of whether he has submitted duly signed copy of system generated application to the Institute. Upon such cancellation, the candidate shall lose the claim on the seat and such seat shall become available for further allotment. If the candidate cancels admission on or before the last day for cancellation of seats with full fees refund as specified by the Competent Authority, the Institute shall refund the entire fees to the candidate after deduction of rupees one thousand only towards processing charges and return all his original documents submitted to the Institute within two days from submission of duly signed copy of system generated application to the Institute;

*(b)* Candidate shall not be entitled to any refund of his/her fee except the Security Deposit and Caution Money Deposit if the online cancellation is effected by the candidate after the last day for cancellation of seats with full fee refund as specified by the Competent Authority. Link for online cancellation for admission shall be deactivated after cut off date. Candidate has to apply for cancellation of admission to the Institute by submitting application to the Institute after the cut off date;

*(c)* No institution, who has in its possession or custody, of any document in the form of Certificates, Degree, Diploma or any other award or other document deposited with it by a person for the purpose of seeking admission in such institution, shall refuse to return such Certificate, Degree, Diploma, award or any other document with a view to induce or compel such person to pay any fee or fees in respect of any course or program of study which such person does not intend to pursue or avail any facility in such institution;

*(d)* The Institution shall not entitle to recover the fees for the subsequent years from the student seeking cancellation of his admission at any point of time.

**16. Change of Course or Institution after First, Second or Third year of Under Graduate and Dual Degree or integrated programme. -**

(1) The candidate seeking for a change in course or shift after successfully completing the First Year of studies or both first and second semester examination in all subjects or failed in one of the heads of passing, shall be allowed to do so in the same institution subject to the availability of seats and changes shall be carried out based on the marks of First Year or First and Second Semester together. The Principal shall be responsible

for ascertaining the eligibility of the candidate as laid down by the concerned University for the course to which the candidate is being transferred.;

(2) Transfer of candidates (Course and/or Institution) after first or second or third year shall be made in the following manner.-

*(a)* The candidate once admitted to the first, second, third or fourth year for a course shall not be eligible for transfer to any other course or Institution during the same academic year;

*(b)* The candidate passing the first year (both first and second semester) or second year (both third and fourth semester) or third year (both fifth and sixth semester) examinations in all subjects or failed in one of the heads of passing are considered as eligible for transfer of Institution or course:

Provided that for transfer after second year the candidate should have passed the first year, and for transfer after third year the candidate should have passed first and second year;

*(c)* There shall be no transfer of students at any stage in any case from Unaided Institutions to the Government or Government Aided, University Departments, University Managed Institutions. However, the candidate from the Government or Government Aided, University Departments, University Managed Institution may seek transfer to the Unaided Educational Institution;

*(d)* deleted;

*(e)* Transfer to Unaided Institutions.- The Principals of Unaided institutions shall consider the candidate from other institutions for transfer with prior approval from the Director of Technical Education on submission of No Objection Certificate (NOC) from Institution, Eligibility Certificate from University and Vacancy position. The Principal or Director shall ascertain the eligibility of candidates as laid down by the concerned University for the course to which the candidate is being transferred;

Transfer in Government or Government aided Institutions- Eligible Candidates aspiring for a transfer from Government or Government Aided or University Departments and University Managed Institutions to other Government or Government Aided or University Department or University Managed Institutions, shall apply in writing to the Principal/ Director of the institute in which he/she studied first year or second semester. The Principal or Director shall forward the consolidated branch wise merit list of eligible candidates giving details like Name, Course, percentage of Marks, Names of Courses and Institution in order of preference to which candidates desires to seek transfer, reasons for transfer and Remarks, along with course wise vacancy position in institution, to the Director of Technical Education, Maharashtra State, so as to reach him as per the schedule given by him. All the Principals of Government and Government Aided Institutions, University Departments and University

Managed Institutions shall submit vacancy position of all courses to the Directorate of Technical Education, Mumbai before stipulated date.

*(f)* No application without recommendation of the Principal of Institution shall be entertained by the Director of Technical Education;

*(g)* If the result of the University or Institution is not declared before the process of transfer, candidate of that University or Institution shall lose his claim on transfer;

(3) The candidates admitted under Supernumerary Quota seats are not eligible for change of Course or Institution;

(4) The candidates from the professional educational institutions which are outside the purview of the Act shall be eligible for transfer to the unaided private professional Educational Institutions subject to the fulfillment of eligibility criterion and requirements stipulated under the provisions of sub-section*(1)* of section 3 of the Act and the fulfillment of the conditions stated in sub-rule *(2)*.

(5) List of all such transfers shall be communicated by the Director of Technical Education to the office of the Admissions Regulating Authority for final approval.

## 17. Documents required to be uploaded along with "Application Form for Centralized Admission Process"

The candidates are required to upload **ALL Original Certificates/Documents** in support of their claim at the time of filling up of Application Form for Admission. The Candidates shall carry the original documents for scrutiny & verification at identified Facilitation Centre as per the process specified by the competent authority. The candidates are required to scan the document in .jpg or .gif format (minimum 150 dpi resolution, file size upto 1 MB) and upload the scanned copies of the required documents at the time of filling up Application Form for Admission. The Facilitation Center shall assist the candidate, free of cost, to scan and upload the documents.

| Sr. No. | Type of Candidate | Copies of documents to be produced along with Application Form for Admission |
|---|---|---|
| 1 | All Candidates | 1. SSC (Std. X) mark sheet.<br>2. HSC/Diploma/B. Sc. mark sheet.<br>3. Qualifying Examination mark sheet<br>4. Score Card Mark Sheet of CET examination such as, JEE / NEET / NATA/ CUET / GATE / GPAT / NEEMS / UCEED etc.<br>5. School Leaving Certificate, if required to substantiate claim.<br>6. Certificate of the **Indian Nationality** of the candidate. |